(13)

जावक क्र. ५०४७ , दिनांक २।९।१९८४

मा. शिक्षणप्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ५,
यांजकडून

मा. / श्री. व्यवस्थापक,
आदर्श शिक्षण मंडळीची,
अभिनव इंग्रजी प्राथमिक शाळा,
एरंडवणे, कर्वे रोड, पुणे ४ यांजकडे

विषय : अभिनव इंग्रजी माध्यमाचे प्राथमिक शाळेस मान्यता देणेबाबत.

संदर्भ : १) मा. शिक्षण मंडळ ठराव क्रमांक - १४४ दिनांक - २१/११/१९८३.
२) मा. सहा. सचिव, महाराष्ट्र शासन, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचे पत्र क्र. व्हीएलएस/१८३/५७५९/सीआर/८१४, प्राशि-१, दिनांक - १६/७/१९८३.
३) आपले पत्र क्रमांक -०२५८१, दिनांक - २३/३/१९८३.

आपले संस्थेचे अभिनव इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा, कर्वेरोड, एरंडवणे, पुणे ४ या शाळेस मा. शिक्षण मंडळ ठराव क्रमांक १४४ दि. २१/११/८३ अन्वये उपरोक्त संदर्भांकित पत्र क्रमांक दोन मधील अटींच्या आधीन राहून अभिनव इंग्रजी माध्यमाचे वरील शाळेस विनाअनुदान तत्वावर इ. १ली ते ४थी चे वर्ग (प्रत्येकी दोन तुकडया) चालू ठेवणेस मान्यता देण्यात आली आहे.

वरील संदर्भांकित पत्र क्रमांक दोन मधील अटी खालील प्रमाणे आहेत.

१) नियमानुसार संस्था रजिस्टर्ड असली पाहिजे.
२) संस्थेने सदर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याचा व भविष्य काळात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही. अशी संमती दिली पाहिजे.
३) संस्थेने शाळेचा एकूण शिक्षक वर्ग विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित (एस. एस. सी. डि. एड.) नेमलाच पाहिजे. व त्यांना नियमानुसार वेतन व भा-ते दिले पाहिजे.
४) संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वत:ची इमारत उपलब्ध केली पाहिजे.
५) शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी पटसंख्या असली पाहिजे.
६) संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.
७) शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे संस्थेन पालन केलेच पाहिजे.
८) शाळेच्या फी चे दर शासनाने विहित केल्यानुसार असले पाहिजे त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.
९) मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील विहित अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

(कृ. मा. पहा)

१०) नियमानुसार अनुसूचित जाती जमातींचा शिक्षकाचे प्रमाण भरणे आवश्यक आहे.

तरी वरील अटींची त्वरीत पूर्तता करून या कार्यालयाकडे पूर्तता अहवाल पाठविण्याची व्यवस्था व्हावी.

कळावे, दिनांक – २/१/१९८[illegible].

( पंडित बनकर )
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा.

~~प्रत : मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १.~~

जादा ३३५१

23 DEC 1983

Abhinava Vidyalaya High School
Erandawana, Karve Road Pune 4
Inward No. ......७०२
Date ......२१.१२.८३
File No. ..............

अत्यंत महत्वाचे

पुणे जिल्हा परिषद, पुणे
[शिक्षण विभाग] १०९
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह२/ज्यातु/१९८३,
पुणे-१, दिनांक : १५ /१२/८३.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका, 23 DEC 1983
अभिनव विद्यालय हायस्कूल एरंडवणा पुणे ४ जिल्हा पुणे.

विषय:- सन १९८३-८४ मध्ये मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांतील वर्गवार तुकड्यांना मंजूरीबाबत.

मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडील सम क्रमांक दिनांक २९-१-१९८३ अन्वये या कार्यालयाचे जा.क्र.शिक्षण/माध्य/ह२/१०९/८३ दि. १/२/१९८३ अन्वये सन १९८२-८३ मधील डिसेंबर १९८२ ची मंजुर तुकड्या त्यांच्या पटसंख्या व हजर सरासरी बाबतची माहिती अ व ब प्रपत्रात मागविण्यात आलेली होती. त्याची छाननी करण्यात आली. ~~[illegible]~~ तसेच १९८३-८४ करीता पुणे जिल्हयासाठी मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मंजूर केलेल्या तुकड्यांची संख्या व आर्थिक तरतूद विचारात घेऊन आपले मंजुरीबाबत मान्यता देणेत येत आहे. शाळेस खाली नमूदकेलेप्रमाणे ८३-८४ साला करीता तुकडी

१] सन १९८२-८३ मध्ये आपले शाळेस मंजूर असलेल्या तुकड्यांची संख्या व विद्यार्थी संख्या लक्षांत घेता सन १९८३-८४ करीता इयत्ता ची तुकडी कमी करुन इयत्ता ची तुकडी देणेत येत आहेत.

२] इयत्ता ५ वी ते ७ वी या वर्गाच्या १९८३-८४ मध्ये मंजूर केलेल्या तुकड्यांच्या प्रमाणातच विहित संख्येनुसार विद्यार्थी दाखल करावेत. त्यापेक्षा जादा होणारे विद्यार्थी दाखल करु नयेत. सदर विद्यार्थी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नगरपालिका या शाळेत पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

३] सन १९८१-८२, १९८२-८३ मध्ये आपले ~~[illegible]~~ शाळेस ~~[illegible]~~ नव्याने मान्यता मिळाल्याने सन १९८३-८४ करीता नैसर्गिक वाढ म्हणून इयत्ता चे वर्ग सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४] सन १९८२-८३ मध्ये मंजूर झालेल्या तुकड्यापैकी सन १९८३-८४ करीता इ. ची तुकडी कमी करणेत येत आहे.

| अ.क्र. : | इयत्ता : | ५वी | ६वी | ७वी | ८वी | ९वी | १०वी | एकूण. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ४ | ४ | ३ | ३ | ३ | ३ | =२० | मराठी माध्यम (x) |
| १. | ८२-८३ तुकड्या | ४ | ४ | ३ | ३ | ३ | ३ | =२० | |
| | | २ | २ | १ | १ | १ | १ | =८ | इंग्रजी माध्यमाने वाढ अनुदान |
| २. | ८३-८४ तुकड्या | २ | २ | २ | १ | १ | १ | =९ | |

मंजूर तुकड्यांच्या व्यतिरिक्त जादा तुकड्या कोणत्याही परीस्थितीत चालू ठेवू नयेत. मंजूर नसलेल्या तुकड्यांचे संबंधात शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पगारास तसेच नामंजूर तुकड्यांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस शासन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. (x) सन ८३-८४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ७ वीची चौथी तुकडी विना अनुदान तत्वावर मंजूर करणेत येत आहे.

[signature]
शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे.

प्रत:- [illegible]

(15)

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे मनपा
जा.क्र. ३८००
दिनांक. १०.१०.८५.

मुख्याध्यापक
अभिनव विद्यालय इंग्रजी माध्यमाची प्रा. शाखा
कर्वे रोड, एरंडवणा पुणे-४.

यांस -

विषय - इ.५वी ते ७ वीचे वर्ग जोडणेबाबत.

तुमचे विनंती अर्जावरुन तुम्हास तुमच्या संस्थेच्या अभिनव विद्यालय मराठी माध्यमाच्या अनुदानप्राप्त शाळेमध्ये सध्या चालविण्यात येणा-या इ.५वी ते ७ वीच्या इंग्रजी माध्यमाचे वर्ग अभिनव विद्यालय इंग्रजी प्राथमिक शाखेकडे विना अनुदान तत्वावर जोडणेस मान्यता देण्यात येत आहे.

नव्याने सुरु करण्यात येणा-या प्रत्येक वर्गास वर्ग सुरु करण्यापूर्वी परवानगी घेण्याची दक्षता घेण्यात यावी.

कळावे दिनांक. १०.१०.८५.

[signature] 10.10.85

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

प्रत -
मुख्याध्यापक
अभिनव विद्यालय मराठी माध्यम प्रा.शाळा
कर्वे रोड, पुणे ४.

By Hand - Parimal.
10/10/85

I. No. 26

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे म.न.पा.
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना शिवाजीनगर पुणे ५

जा. क्र. मनपा/खाप्राशा/२६५६
दिनांक -

मुख्याध्यापिका,
अभिनव विद्यालय इंग्लिश
मिडीयम प्रायमरी स्कूल,
१०२/१०३, एरंडवणा,
पुणे - ४११००४.

विषय - इ. १ली ते ५ वी च्या प्रत्येकी ३ जादा तुकड्यांना मान्यता देणेबाबत.

संदर्भ - तुमचेकडील दि. २।८।९९ चे पत्र.

संदर्भांकित पत्रान्वये तुम्ही इ. १ली ते ५ वीच्या प्रत्येकी ३ जादा तुकड्यांना मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव जानेवारी ९८ मध्ये आमचे कार्यालयाकडे पाठविला होता असे नमूद केले आहे परंतु त्यापूर्वीच सर्व शाळांचे प्रस्ताव मा. शि. उपसंचालक यांचेकडे पाठविण्यात आलेले होते.

तसेच इ. १ली ते ५ वी च्या या सर्व जादा तुकड्यांना वेळच्यावेळी मान्यता का घेतली नाही? याबाबतचा लेखी खुलासा सादर करण्यात यावा.

कळावे, दि. ६।५।९९

गोखले
शिक्षणप्रमुख
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

३१।७।२०००

शिक्षण मंडळ कार्यालय,पुणे महानगरपालिका,
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर,पुणे - ४११ ००५,
जा.क्र./खाप्राशा/ तु.मा/२९५९/२०००-२००१,
पुणे,दिनांक २५।७।२०००

शाळाप्रमुख,
आभिनव विद्यालय इंग्रजी माध्यम
प्राथ. शाळा, कर्वे रोड, पुणे- ४११००४

विषय :-मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नवीन तुकडया उघडण्यास मान्यता देणेबाबत.
संदर्भ :-मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे-१ यांचेकडील पत्र जा.क्र.-प्रा/प्रशि/जा.तु./पी.आर/पुवि/५९५९/९९-२००० दिनांक - २९/५/२०००

संदर्भांकित पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जादा तुकडयांच्या प्रस्तावाची मा.शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग,पुणे यांनी छाननी केली असता तुमचे शाळेतील खालील दर्शविलेल्या ~~जोडी~~ इ.१ ते ७ इयत्तांच्या जादा तुकडीस/~~नैसर्गिक~~ वाढीच्या वर्गास जून,१९९९-२०००पासून परवानगी देण्यात येत आहे/~~नाही~~.

| शाळेचे नाव | इयत्ता | जादा तुकडी/ ~~नैसर्गिक वाढ~~ | शेरा |
|---|---|---|---|
| आभिनव विद्यालय (इंग्रजी) | इ.१ ली<br>इ.२ री<br>इ.३ री<br>इ.४ थी<br>इ.५ वी ते ७ वी | ३ री व ४ थी तुकडी<br>२ री, ३ री व ४ थी तुकडी<br>—"—<br>—"—<br>३ री व ४ थी तुकडी | कायम विना अनुदान तत्वावर मंजूर |

१] वरील जादा तुकडयांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी.

२] सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.

३] जादा वर्गास शिक्षक नेमताना विहित वयोमर्यादेतील व प्रशिक्षित [डी.एड] व रोस्टर अंकाप्रमाणे शिक्षक नेमावा.

कळावे,दिनांक - २४/७/२०००

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ,पुणे महानगरपालिका.

received on 31.7.2000

" यशवंतराव चव्हाण भवन "
पुणे जिल्हा परिषद पुणे.

जा.क्र. शिक्षण.माध्य. ह.१२. तुकड्या २०००.०१
कायम विना अनुदानित मराठी / इंग्रजी माध्यम
दिनांक 23 MAR 2001 .२०००.०१.

प्रती,
मुख्याध्यापक : मुख्याध्यापिका
अभिनव शिक्षण इंग्लिश मेडियम ... पुणे - ४११०००
ता. ------------ पिन नं. ---------- पुणे शहर. ४११००४ Pune

विषय :- कायम विना अनुदानित तत्वावरील माध्य.शाळांतील जादा तुकड्यांना मंजूरी सन २०००.०१ मराठी / इंग्रजी माध्यमांच्या

संदर्भ :- मा.शिक्षण महसंचालक माध्य. व उच्च माध्य. शिक्षण संचालनाल महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कडील पत्र अमाशा. १२२ के. ७१६३ १५ क १ दिनांक १५.१२.०० अन्वये.

उपरोक्त विषयी कळविण्यांत येते की, आपल्या माध्यमिक शा शासनाने कायम विना अनुदान तत्वावर परवानगी दिलेली आहे. आपण मागणी केल प्रमाणे शैक्षणी कवर्षे २०००.०१ करिता कायम विना अनुदान तत्तवार खाली नमुद केलेल अटींची पूर्तता करण्यांच्या शर्तीवर पुढील प्रमाणे जादा तुकडीस परवानगी देण्यांत येत

माध्यमिक शाळेचे नाव :- अभिनव शिक्षण इंग्लिश मेडियम

| अ.क्र. | इयत्ता वर्ग | तुकडी क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|
| १] | ८ वी | २री व ३री + ४थी | |
| २] | ९ वी | २री व ३री + ४थी | |
| ३] | १० वी | २री व ३री + ४थी | |
| ४] | | | |
| ५] | | | |
| ६] | | | |

अटी शर्ती

१] जुलै / ऑगस्ट मधील पट पडताळणी नंतर माध्य. केलेल्या पटावर वरील तुकडी मंजुर केलेली आहे.

२] मान्य पटापेक्षा कमी पट असल्यांस / आढळल्यांस सदर तुकडी नादेय राहिल.

३] तुकडी मंजुर झाल्यांनतर ही ती शाळेने सुरु केलेली नाही असे निदर्शनांस आल्यांस सदरची तुकडी आपोआपच रद्द होईल.

४] सदर तुकड्यांचा आदेश प्राप्त होताच तुकडी / तुकड्या मंजुर असल्यांस अहवाल मुख्या.

[ पान न. नं. २]

– कांने / प्राचार्याने शिक्षणाधिकारी यांचे कडे पाठवावा. अन्यथा तुकडी चालु नाही असे गृहित धरुन ती मंजुर तुकडी बंद करण्यात येईल.

५] सदर तुकडीवर नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचा–यांची संच मान्यता आणि वैयक्तिक मान्यता विषयक प्रस्ताव आदेश मिळाल्यापासून ३१० दिवसांचे आत या कार्या– –लयांच्या वैयक्तिक मान्यतेच्या शिबिरामध्ये दाखल करणे बंधनकारक राहिल.

६] सदर वर्गाच्या तुकडीत निकषापेक्षा पट कमी झाल्यास ती तुकडी मुख्याध्यापकाने तात्का बंद झाल्याचे या कार्यालयास कळवावे.

शिक्षणाधिकारी [ माध्य. ],
पुणे जिल्हा परिषद पुणे.

प्रत :- यांना माहितीसाठी सविनय सादर,
मा. शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे.

प्रत :- हेच कार्यालय.
श्री. सौ. जाधव, लोंढे, जोशी.
[ सोबत यादी जोडली आहे. ].

ADARSHA SHIKSHAN MANDALI
Inward No. ०५६३
Date २१-९-१६
PUNE-411004

शिक्षण मंडळ कार्यालय पुणे महानगरपालिका
भाऊसाहेब शिरोळे भवन जुना तोफखाना
शिवाजीनगर पुणे 5
जा.क्र / शि.मं. / खाप्राशा / ३२३६ / 2016–17
दिनांक :– २१ / 09 / 2016

प्रति,
मानद कार्यवाह,
आदर्श शिक्षण मंडळी, पुणे
पुणे

**विषय – बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 तसेच बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2011 नूसार प्राथमिक शाळेला 8 वीचा वर्ग जोडणेबाबत**

संदर्भ –
1. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2011
2. आपल्या संस्थेचा दिनांक 30 / 08 / 2016 चा प्रस्ताव

उपरोक्त विषयास अनुसरून, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 तसेच बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2011 नूसार संस्थेच्या इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता 1 ली ते 7 वीच्या प्राथमिक शाळेला 8 वीचा वर्ग जोडणेस मायता मिळणेबाबतचा संदर्भाकीत प्रस्ताव इकडील कार्यालयास सादर केलेला आहे.

संस्थेने सादर केलेला प्रस्ताव / ठरावा तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 तसेच बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2011 मधील तरतुदींस अनुसरून खालील अटीं शर्तीस अनुसरून संस्थेच्या अभिनव विद्यालय इंग्रजी माध्यम प्रायमरी स्कूल,पौड फाटा, पुणे 4 या शाळेस इयत्ता आठवीचा वर्ग जोडणेस मान्यता देण्यात येत आहे.

अटी व शर्ती
1. उपलब्ध वर्ग खाल्यांमध्येच इयत्ता आठवीचा वर्ग सुरू करणेत यावा
2. उपरोक्त वर्गासाठी नव्याने शिक्षकपद मंजूर होणार नाही.
3. विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेणेत यावी
4. संस्थेने सादर केलेली माहीती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास सदरची मान्यता त्वरीत रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रशासकीय अधिकारी,
शिक्षण मंडळ पुणेमहानगरपालिका पुणे

To,
The Hon. Secretary

Date: 21 SEP 2016